# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या ६४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.१९ ऑगस्ट, २०१४ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची ६४ वी बैठक मंगळवार, दि.१९ ऑगस्ट, २०१४ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरु महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ३) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., संचालक, म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ४) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ५) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ७) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ८) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. देशमुख एम. एस. | सदस्य |
| १०) | डॉ. करचे बी. आर. | सदस्य |
| ११) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १२) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १३) | श्री. पाटील बी. पी. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १४) | श्री. अनपट एस. बी. प्र. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १५) | श्री. माळी एस. के., कुलसचिव | सचिव |

**स्वागत:**

मा.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

परीक्षा नियंत्रक पदावर नव्याने निवड झालेले श्री. बी. पी. पाटील यांची व्यवस्थापन परिषदेची ही पहिली बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरुमहोदयांनी पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्राचार्य श्री. धुत्तरगाव एस. सी. यांनी दूरध्वनीद्वारे व सौ. पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील यांनी पत्राद्वारे अनुपस्थिती कळविली. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली. अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई, प्र. सहसंचालक (तं. शि.), तंत्र शिक्षण संचालक यांचे प्रतिनिधी व विभागीय सहसंचालिका (उच्च शिक्षण) सोलापूर विभाग हे सदस्य व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

**सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ ०१ ]** **दि.२२ जुलै, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव:** **दि.२२ जुलै, २०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व ठरावानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव:** **महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (एक्स) नुसार मा. कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ]** **विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक पुरविण्यासंदर्भात पश्चिम महाराष्ट्र सुरक्षा रक्षक संघटना, कराड या मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः व्यवस्थापन परिषदेच्या दि.२२/०७/२०१४ च्या बैठकीत विषय क्र. ६(६) वर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

**"सदरचा विषय शासन निर्णय व इतर कागपत्रांसह पुढील बैठकीत पुनश्चः सादर करावा. या बाबतीत अंतिम निर्णय होईपर्यंत सध्याची सिक्युरिटी व्यवस्था चालु ठेवावी असे सर्वानुमते ठरले ".**

(टिपणीः उक्त ठरावाच्या अनुषंगाने पश्चिम महाराष्ट्र सुरक्षा रक्षक संघटना, कराड या मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेण्या संदर्भात शासन निर्णय व इतर कागदपत्र विद्यापीठास सादर करण्याबाबत दूरध्वनीवरुन कळविण्यात आले. त्यानुसार संबंधितांनी दि.०७/०८/२०१४ रोजी खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केली आहे.

१. उद्योग ऊर्जा व कामगार विभागाची दि.२१/०२/२०१२ रोजी प्रकाशन झालेली अधिसूचना (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-ल). सदर शासन अधिसूचना मध्ये विविध जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ नुसार सुरक्षा रक्षक घेण्यासंदर्भात संस्थेची नोंदणी करणे, सुरक्षा रक्षकांचे नियम, अटी, वेतन व इतर तरतुदीचे उल्लेख केलेला आहे.

२. कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.८ नोव्हेंबर, २००६ च्या शासन निर्णयाची प्रत या कार्यालयास सादर केलेली आहेत त्यात सुरक्षा रक्षक नेमण्याबाबत खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

*"सरकारी, निमसरकारी क्षेत्रे/उपक्रम/शासकीय मंडळे, महामंडळे/महानगरपालिका/स्थानिक स्वराज्य संस्था/सहकारी संस्था/शासकीय कार्यालये इत्यादीना ज्या-ज्या वेळी सुरक्षा अधिकारी/सुरक्षा रक्षक यांची आवश्यकता असेल त्या त्या वेळी संबंधित उपक्रम/ संस्था इत्यादींनी यापुढे खाजगी अभिरकणामधून सुरक्षा अधिकारी/सुरक्षा रक्षक यांची मागणी न करता शासनाने स्थापन केलेल्या सुरक्षा रक्षक मंडळाकडूनच सुरक्षा अधिकारी/सुरक्षा रक्षक यांची मागणी करावी व त्यातूनच आपापल्या आस्थापनांमध्ये सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी. "*

३. कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा दि.८ नोव्हेंबर, २००६ चा शासन निर्णय व दि.२७/०५/२०१४ रोजीच्या शासन पत्राची छायांकित प्रत सादर केली आहे. सदरच्या पत्रात परिच्छेद क्र.२ मध्ये खालील प्रमाणे मजकूर नमूद केला आहे.

*"सदरहू दि.८/११/२००६ रोजीच्या शासन निर्णय स्वयंस्पष्ट असून, विद्यापीठ हे सदरहू शासन निर्णयातील नमुद केलेल्या उपक्रमांपैकीच एक असल्याने त्यांनाही उक्त शासन निर्णयानुसार मंडळाचे नोंदित सुरक्षा रक्षक नियुक्त करणे बंधनकारक आहे."*

सबब, विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक पुरविण्यासंदर्भात पश्चिम महाराष्ट्र सुरक्षा रक्षक संघटना, कराड या मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेण्यासाठीची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः** **विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक पुरविण्यासंदर्भात पश्चिम महाराष्ट्र सुरक्षा रक्षक संघटना, कराड या मंडळाकडून सुरक्षा रक्षक घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली तथापि करार करण्यापूर्वी कायदेशीर बाबी तपासाव्यात असे सर्वानुमते ठरले.**

**[ ०४ ] सोलापूर विद्यापीठाच्या संकुलातील परिविक्षाधीन कालावधीत कार्यरत असलेले डॉ. महाडीक एस. बी., सहायक प्राध्यापक यांना सेवेत कायम करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी- प्रस्तुत विद्यापीठाच्या संकुलातील डॉ. महाडीक एस. बी., सहायक प्राध्यापक यांचा खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे परिविक्षाधीन कालावधी पूर्ण होत आहे.

| अ. क्र. | अध्यापकाचे पूर्ण नाव | धारण केलेले पद | रुजू दिनांक | परिविक्षाधीन कालावधी संपत असलेला दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. शशिभूषण बाबासाहेब महाडीक | सहायक प्राध्यापक | ०९/०८/२०१२ | ०८/०८/२०१४ |

परिनियम २७० (३) नुसार संचालक/विभागप्रमुख यांच्याकडून त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेले डॉ. महाडीक एस. बी. यांना प्रस्तुत विद्यापीठाच्या सेवेत कायम करावे किंवा नाही याबाबत त्यांचे "Definite remarks and recommendation" मागविले होते. त्यानुसार त्यांनी डॉ. महाडीक यांना सेवेत कायम करावे अशाप्रकारे गोपनीय पत्राव्दारे कळविले आहे.

तसेच परिनियम क्र. २७० अन्वये सहामाही गोपनीय अहवाल आणि परिनियम क्र.२७४ नुसार वार्षिक स्वयंमूल्यमापन अहवाल संकुलाच्या संचालकांनी पाठवून दिले असून ते मा. कुलगुरु यांनी पुनर्विलोकनही केले आहेत.

सबब, डॉ. महाडीक यांना, त्यांचा परिविक्षाधिन कालावधी पूर्ण होत असलेल्या दिनांका पासून, दिनांक ०८/०८/२०१४ पासून प्रस्तुत विद्यापीठाच्या सेवेत कायम करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः सोलापूर विद्यापीठाच्या संकुलातील परिविक्षाधीन कालावधीत कार्यरत असलेले डॉ. महाडीक एस. बी., सहायक प्राध्यापक यांना दि.०९/०८/२०१४ पासून सेवेत कायम करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०५ ] पश्चिम विभागीय व राष्ट्रीयस्तरीय युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या कलाकारांना तसेच विद्यार्थी संसद सदस्यांना व युवा महोत्सव समितीच्या सदस्यांना देण्यात येणारे ब्लेजर तयार करुन घेण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: पश्चिम विभागीय व राष्ट्रीयस्तरीय युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या कलाकारांना तसेच विद्यार्थी संसद सदस्यांना व युवा महोत्सव समितीच्या सदस्यांना देण्यात येणारे ७५ नग ब्लेजर खरेदी करण्यासाठी दि.१५/०७/२०१४ रोजी दैनिक संचार या वृत्तपत्रातून जाहीर निविदा देण्यात आली होती. त्यास अनुसरुन एकूण २१ दिवसांच्या कालावधीत तीन निविदा प्राप्त झाल्या. दि.०६/०८/२०१४ रोजी पुरवठाधारकासमोर निविदा उघडण्यात आल्या. निविदेत नमूद कपडयाच्या नमुन्याचा विचार होता सन २०१३-१४ या वर्षातील ब्लेजरच्या कापडाप्रमाणेच रेमंड सुपर ट्रोविन मेटीच्या कापडात रु.१७००/- प्रति नगाप्रमाणे ७५ नग L- 1 , न्युनतम दर असलेले एल. के फॅशन्स, सोलापूर यांच्याकडून तयार करुन घेण्याची शिफारस करण्यात आली. शिफारसीनुसार रेमंड सुपर ट्रोवीन मेटी कापडात रु.१७००/- प्रति ब्लेजर प्रति नगा प्रमाणे

एल. के फॅशन्स, सोलापूर यांच्याकडून एकुण ७५ नग तयार करुन घेण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **पश्चिम विभागीय व राष्ट्रीयस्तरीय युवा महोत्सवात सहभागी होणाऱ्या कलाकारांना तसेच विद्यार्थी संसद सदस्यांना व युवा महोत्सव समितीच्या सदस्यांना देण्यात येणारे ब्लेजर रेमंड सुपर ट्रोवीन मेटी कापडात रु.१,७००/- प्रति ब्लेजर प्रति नगाप्रमाणे एल. के. फॅशन्स, सोलापूर यांच्याकडून एकूण ७५ नग तयार करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) (मुस्लिम) प्रवर्गाकरीता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करण्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणीः- दि.२४ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी अध्यादेश क्र.१४ दि.०९ जुलै, २०१४ व शुध्दीपत्रक दि.१४ जुलै, २०१४ व शासन निर्णय दि.१९ जुलै, २०१४ नुसार नवीन प्रवर्ग तयार करण्यात आलेला असून, या प्रवर्गात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मुस्लिम गटाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय/निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये ५ टक्के आरक्षणाची तरतुद लागू करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि.२९/०३/१९९७ अन्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात दिलेल्या "परिशिष्ट-अ" नुसार सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

तसेच विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) साठी सरळसेवेने भरण्यात येणारी ५ टक्के आरक्षणाची पदे दि.०९ जुलै, २०१४ पासून भरणे आवश्यक असून, त्यामुळे संवर्गामध्ये दि.०९ जुलै, २०१४ रोजी रिक्त असणारी व त्यानंतर सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षाकरिता विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) याकरिता आरक्षणाची गणना करतांना "परिशिष्ट-ब" नुसार दिलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा व ज्या महाविद्यालयांची दि.०९ जुलै, २०१४ पूर्वीच सरळसेवा भरतीमधील निवड प्रक्रिया सुरु झाली असेल अशा प्रकरणांना या अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम, २००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच ज्या प्रकरणी सरळसेवा भरतीच्या प्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झालेली आहे त्याचे पुनर्विलोकन करण्याची आवश्यकता नाही असे आदेश निर्गमित केले आहेत.

सबब, उक्त शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठरावः विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) (मुस्लिम) प्रवर्गाकरीता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करण्याबाबतच्या दि.२४ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी अध्यादेश क्र.१४ दि.०९ जुलै, २०१४ व शुध्दीपत्रक दि.१४ जुलै, २०१४ व शासन निर्णय दि.१९ जुलै, २०१४ या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०७ ] शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) (मराठा) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करण्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणीः- दि.२४ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता अध्यादेश क्र.१३ दि.०९ जुलै, २०१४ व शासन निर्णय दि.१५ जुलै, २०१४ नुसार नवीन प्रवर्ग तयार करण्यात आला असून, या प्रवर्गात मराठा समाजाचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गासाठी राज्याच्या लोकसेवांमधील शासकीय/निमशासकीय सेवेत सरळसेवा भरतीच्या पदांमध्ये १६ टक्के आरक्षणाची तरतूद लागू करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब दि.२९/०३/१९९७ अन्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात दिलेल्या "परिशिष्ट-अ" नुसार सुधारित बिंदुनामावलीचा अवलंब करण्यात यावा.

तसेच शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी (ईएसबीसी) सरळसेवेने भरण्यात येणारी १६ टक्के आरक्षणाची पदे दि.०९ जुलै, २०१४ पासून भरणे आवश्यक आहे. त्यामुळे संवर्गामध्ये दि.०९ जुलै, २०१४ रोजी रिक्त असणारी पदे व त्यानंतर सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त होणारी पदे विचारात घेऊन चालू भरती वर्षात तसेच त्यापुढील भरती वर्षाकरिता शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) या प्रवर्गाकरीता आरक्षणाची गणना करतांना "परिशिष्ट-ब" नुसार दिलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा व ज्या महाविद्यालयांची सरळसेवा भरतीमधील निवड प्रक्रिया ही दि.०९ जुलै, २०१४ च्या अध्यादेशापूर्वीची असेल त्यांना या तरतुदी लागू होणार नाहीत. अशा प्रकरणांच्या बाबतीत, सदर अध्यादेशाच्या प्रारंभापूर्वी जे शासकीय आदेश लागू होते आणि आरक्षण अधिनियम, २००१ मधील ज्या तरतुदी लागू होत्या त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी असे आदेश निर्गमित केले आहेत.

सबब, उक्त शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठरावः शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) (मराठा) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी सुधारित बिंदुनामावली विहित करण्याबाबतच्या दि.२४ जुलै, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता अध्यादेश क्र.१३ दि.०९ जुलै, २०१४ व शासन निर्णय दि.१५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०८ ] राज्यात शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी (ईएसबीसी) (मराठा) व विमाप्र-अ (मुस्लिम) प्रवर्गाकरिता नव्याने दिलेल्या आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा पदभरती बरोबरच शैक्षणिक संस्थेमधील प्रवेशासाठी लागू करण्यात आलेली तरतूद माहितीस्तव.**

(टिपणीः- महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३ व १४ दि.०९ जुलै, २०१४ व शासन निर्णय दि.१५ जुलै, २०१४ व दि.१९ जुलै, २०१४ अन्वये राज्यात शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजासाठी, शैक्षणिक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (शै.सा.मा.प्र.) Educationally and Socially Backward Category (ESBC) व विशेष मागास प्रवर्ग-अ (विमाप्र-अ) Special Backward Category-A (SBC-A) हा नवीन प्रवर्ग तयार करण्यात आलेला असून, या प्रवर्गात मराठा व मुस्लिम प्रवर्गाचा समावेश करण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने मराठा व मुस्लिम समाजास राज्यात शासकीय/निमशासकीय, सरळसेवा पदभरतीबरोबरच शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त मराठा १६% व मुस्लिम ५% आरक्षणाची तरतूद लागू करण्यात आली आहे.

सबब, उक्त शासन अध्यादेश व शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठरावः राज्यात शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी (ईएसबीसी) (मराठा) व विमाप्र-अ (मुस्लिम) प्रवर्गाकरिता नव्याने दिलेल्या आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा पदभरती बरोबरच शैक्षणिक संस्थेमधील प्रवेशासाठी लागू करण्यात आलेल्या तरतूदीबाबतच्या दि.१५ जुलै, २०१४ व दि.१९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०९ ] विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थी परिषद स्थापन करण्याच्या तारखा बदलाबाबत मा कुलगुरुंनी केलेली कार्यवाही माहीतीस्तव.**

(टिपणी: विद्यार्थी परिषद स्थापन करण्यासाठी तारखा निश्चित करण्याबाबत विद्यापीठ परिनियम S.446 मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

The Principal shall finalize the nomination of the student members and other namely, one lecturer on the basis of his/her interest and experience in the students welfare activities, one Sr. Division NCC Officer, one NSS Programme Officer, and the Director of Sports and Physical Education, if any, on the Students' Council as per the provision in Section 40 (2) (b) and declare the Students' Council, duly formed on a date fixed by the Management Council.

त्यानुसार, विद्यार्थी परिषदेच्या निवडणूकीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या. या तारखांना व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक होते. परंतु, नजीकच्या काळात व्यवस्थापन परिषदेची बैठक होणार नसल्याने, मा.कुलगुरु यांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम १४ (७) नुसार तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील तारखांना मान्यता दिली होती.

| अ. क्र | प्रक्रियेचे नाव | महाविद्यालय स्तर | विद्यापीठ अधिविभाग स्तर |
|---|---|---|---|
| १) | महाविलयांना पत्राव्दारे कळविण्याची तारीख | १४/०७/२०१४ | १४/०७/१४ |
| २) | महाविद्यालयातील विद्यार्थी मंडळाच्या स्थापनेची घोषणा | ०५/०८/२०१४ | ०५/०८/२०१४ |
| ३) | सचिव पदाची निवडणूक | १२/०८/२०१४ | १२/०८/२०१४ |
| ४) | सचिवासाठीचा प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख | १९/०८/२०१४ | |
| ५) | विद्यापीठ विद्यार्थी मंडळाची घोषणा | २६/०८/२०१४ | |
| ६) | विद्यापीठ सचिव व अध्यक्ष पदाची निवडणूक | ०५/०९/२०१४ | |

यानुसार, कार्यालयाचे पत्र जा. क्र सोविसो / विद्यार्थी कल्याण / २०१४-१५ / ३९३४ दि.१४/०७/२०१४ अन्वये, सर्व संलग्नित महाविद्यालयांना या तारखा कळविण्यात आल्या होत्या. परंतु, उक्त तारखांच्या कालावधीमध्ये काही विद्याशाखांच्या परीक्षांचे निकाल जाहीर न झाल्याने, महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली नव्हती. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना विद्यार्थी परिषदेवर प्रतिनिधित्व मिळावे या उद्देशाने या तारखा पुढे ढकलाव्यात अशी

काही महाविद्यालयांनी विनंती केलेली होती. त्यामुळे कार्यालयीन टिपणी सादर करुन मा.कुलगुरु यांच्या मान्यतेन्वये या तारखा रद्द करुन व नवीन तारखांना मा.कुलगुरु यांची मान्यता घेतली. त्यावेळी देखील नजीकच्या काळात, व्यवस्थापन परिषदेची बैठक होणार नसल्याने मा.कुलगुरु यांची महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम १४ (७) नुसार या नवीन तारखांना व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता घेतली.

या सुधारीत तारखा खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र | प्रक्रियेचे नाव | जुन्या तारखा | | नवीन तारखा | |
|---|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालय स्तर | विद्यापीठ अधिविभाग स्तर | महाविद्यालय स्तर | विद्यापीठ अधिविभाग स्तर |
| १) | महाविद्यालयांना पत्राव्दारे कळविण्याची तारीख | १४/०७/२०१४ | १४/०७/२०१४ | २३/०७/२०१४ | २३/०७/२०१४ |
| २) | महाविद्यालयातील विद्यार्थी मंडळाच्या स्थापनेची घोषणा | ०५/०८/२०१४ | ०५/०८/२०१४ | १४/०८/२०१४ | १४/०८/२०१४ |
| ३) | सचिव पदाची निवडणूक | १२/०८/२०१४ | १२/०८/२०१४ | २१/०८/२०१४ | २१/०८/२०१४ |
| ४) | सचिवासाठीचा प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख | १९/०८/२०१४ | | २८/०८/२०१४ | २८/०८/२०१४ |
| ५) | विद्यापीठ विद्यार्थी मंडळाची घोषणा | २६/०८/२०१४ | | ०५/०९/२०१४ | ०५/०९/२०१४ |
| ६) | विद्यापीठ सचिव व अध्यक्ष पदाची निवडणूक | ०५/०९/२०१४ | | १५/०९/२०१४ | १५/०९/२०१४ |

वरील नवीन तारखा कार्यालयाचे पत्र जा.क्र. सोविसो / विद्यार्थी कल्याण / २०१४-१५ / ४३४४ दि.२३/०७/२०१४ अन्वये, सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात आल्या आहेत.

सबब, विद्यार्थी परिषदेच्या निवडणूकीच्या तारखा निश्चित करण्याबाबत मा.कुलगुरु यांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ मधील कलम १४(७) नुसार, जुन्या तारखांबाबत केलेली कार्यवाही व या तारखा रद्द करुन नवीन तारखांबाबत व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव सादर).

**ठराव:** **मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ १० ] विद्यापीठासाठी कुरिअर सेवा वार्षिक दर करार करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी- विद्यापीठास टपालाची सेवा पुरविण्यासाठी कुरिअर सेवा वार्षिक दर करार करणे या कामाकरिता दि.२४/०६/२०१४ रोजी लोकमत वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम दि.१४/०७/२०१४ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत होती. अंतिम मुदतीमध्ये एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. दि.१५/०७/२०१४ रोजी प्राप्त निविदेतील तांत्रिक निविदा निविदाधारक व निविदा उघडणे समिती सदस्य यांच्या समक्ष उघडण्यात आल्या असता, चार निविदेपैकी एकच निविदा तांत्रिक निविदा बाबी पूर्ण करत होती. उर्वरित तीन निविदा तांत्रिक बाबी पूर्ण करीत नसल्यामुळे अपात्र झाल्या.

सदर कुरिअर सेवेसाठी प्रथम मुदतवाढ जाहिरात दि.२४/०७/२०१४ रोजी लोकमत वर्तमानपत्रामध्ये देण्यात आली. निविदा स्विकारण्याची अंतिम दि.३०/०७/२०१४ रोजी सायं. ४:०० वाजेपर्यंत होती. निविदा स्विकारण्याच्या अंतिम वेळेत एकच निविदा प्राप्त झाली. तथापि सदर निविदा ही पूर्वी निविदा भरलेल्या व पात्र असलेल्या निविदा धारक मे.तेज कुरिअर, कोल्हापूर यांनी पुन्हा भरली होती.

प्रथम मुदतवाढीमध्ये एकच निविदा प्राप्त झाली. एकूण तीन निविदा आवश्यक असल्यामुळे पुनश्चः सात दिवसाची द्वितीय मुदतवाढ दि.३१/०७/२०१४ रोजी मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने दि.०१/०८/२०१४ रोजीच्या लोकमत वर्तमानपत्रात व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर द्वितीय मुदतवाढ जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख ०७/०८/२०१४ रोजी सांय.४:०० वाजेपर्यंत होती. अंतिम तारखेपर्यंत एकही निविदा प्राप्त झाली नाही.

सबब, मूळ टेंडर निविदा तसेच दोन वेळा देण्यात आलेल्या मुदतवाढीमध्ये एकच निविदा प्राप्त झाली आहे. सदर दराची निविदा ही दि.०७/०८/२०१४ रोजी सायं. ४:०० वाजता मा.कुलगुरु यांची मान्यता घेऊन निविदाधारक व निविदा उघडणे समिती समोर उघडण्यात आली. मे.तेज कुरिअर, कोल्हापूर यांची दराची निविदा उघडण्यात आली व त्यांचे कुरिअर सेवेचे दर स्विकारण्यात आले. विद्यापीठासाठी टपालाची कुरिअर सेवा पुरविण्यासाठी वार्षिक दर करार करणे कामाच्या दराचा तक्ता सोबत जोडला आहे. तक्त्यानुसार मे. तेज कुरिअर कोल्हापूर, यांच्याकडून कुरिअर सेवा घेण्याकरिता वार्षिक दर करार करण्याची बाब विचारार्थ).

**ठरावः विद्यापीठासाठी कुरिअर सेवा मे. तेज कुरिअर, कोल्हापूर यांच्याकडून सेवा घेण्याकरिता आदेशाच्या तारखेपासून एका वर्षासाठी दर करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

दि.०७/०८/२०१४

**आवक-जावक विभाग सोलापूर विद्यापीठ सोलापूर**

**कुरीयर सेवेकरिता प्राप्त झालेल्या निविदेतील दराचा तक्ता**

| अ.क्र. | फर्मचे नांवे | | दर सर्व करासहीत प्रत्येकी २०० ग्रॅम वजनापर्यंत | दर सर्व करासहीत प्रत्येकी २०० ग्रॅम वजनापुढील | टपाल पोहचण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे. तेज कुरियर कोल्हापूर | सोलापूर शहर | रक्कम रु.१०/- | रक्कम रू.८/- | २४ तास |
| | | संपूर्ण सोलापूर जिल्हा | रक्कम रू.१५/- | रक्कम रू.१०/- | २४ तास |
| | | संपुर्ण महाराष्ट्र | रक्कम रू.२१/- | रक्कम रू.१३/- | २४ ते ४८ तास |
| | | आंतरराज्य | रक्कम रू.३६/- | रक्कम रू.२५/ | ४८ ते७२ तास |

कुरिअर सेवेकरिता वार्षिक दरार करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकूण प्राप्त चार निविदेपैकी एकच निविदा तांत्रिक दृटया पात्र झाल्यामुळे पुन्हा दोन मुदतवाढी देण्यात आल्या. सदर मूदतवाढीमध्ये मे.तेज कुरिअर, कोल्हापूर यांचीच एक निविदा प्राप्त झाली. सबब दोन मुदतवाढीनंतर एकच निविदा पुर्वीची दराची निविदा उघडण्यात आली. त्यामध्ये जी कमी दराची आहे. ती विचारात घेऊन व तशी मे तेज कुरिअर, कोल्हापूर या फर्मकडून संमती घेऊन निविदेतील दराचा वरीलप्रमाणे तक्ता तयार करण्यात आला आहे. तक्त्यातील दराप्रमाणे मे.तेज कुरिअर, कोल्हापूर यांना कुरिअर सेवेचे काम देण्याची शिफारस करीत आहे.

सदस्य खरेदी समिती | सदस्य खरेदी समिती | सदस्य खरेदी समिती | वित्त व लेखाधिकारी | कुलसचिव | **मा.कुलगुरुसो.**

**[ ११ ] दि.२४/०७/२०१४ च्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांत वित्त व लेखा समितीने केलेल्या शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: दि.२४/०७/२०१४ रोजीच्या ख्ररेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statute No.S.324 नुसार वित्त व लेखा समितीस तसेच व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता त्यास दिनांक ०६/०८/२०१४ च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेची शिफारस केली आहे.

सबब, दि.२४/०७/२०१४ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: वित्त व लेखा समितीने दि.२४/०७/२०१४ च्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतामध्ये केलेल्या शिफारशी स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ] प्रस्तूत विद्यापीठातील शिक्षक / शिक्षकेतर सेवकांना, संलग्नित महाविद्यालयास व महाविद्यालयातील शिक्षकांना देण्यात येणाऱ्या आग्रीम रकमेच्या समायोजनेबाबत.**

(टिपणी: प्रस्तूत विद्यापीठातील शिक्षक / शिक्षकेतर सेवकांना, संलग्नित महाविद्यालयास / शिक्षकांना परीक्षेच्या व इतर कामासाठी तसेच कार्यालयीन कामे / खरेदीसाठी विविध फर्मला इ. मा. विभाग प्रमुखांच्या शिफारशीनुसार आग्रीम रक्कम देण्यात येते. तथापि, असे निदर्शनास आले आहे की, संबंधितांस देण्यात आलेल्या आग्रीम रक्कमेचे त्यांच्याकडून समायोजन वेळेत होत नसल्याने याबाबत संवैधानिक लेखापरीक्षक व महालेखाकार, मुंबई यांनी त्यांच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये वेळोवेळी आक्षेप उपस्थित केलेला आहे. प्रलंबित तसलमातबाबत व्यवस्थापन परिषद व अधिसभेमध्ये चर्चा झालेली आहे.

उक्त वस्तुस्थिती विचारात घेता तसलमात रक्कमेचे समायोजन वेळेत होण्याकरिता समान लेखासंहिता मधील नमूद तरतूद १.८६(२) ते (६) नुसार कार्यपध्दती अवलंबणे आवश्यक आहे. याचा तपशील खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| 2) | The amount of the advance is to be utilized specifically for the purpose for which it was sanctioned. |
| 3) | Advances will generally be issued to the resposnsible person on the recommendations of the Head of the Sections / Departments. The responsibility for adjustment of these advances shall be on the Head of the Department / Section who recommended the advances. Register in prescribed form should be maintained by the Head of Department. |
| 4) | No second advance or subsequent advances will ordinarily be granted unless the first advance for the same head of the account is fully recouped. However, in exceptional cases, the second advance may be granted with the specific approval of the competent authority. |
| 5) | All advances except those for which specific time limit for refund / adjustment is provided elsewhere in the Rules, should, as far as possible, be settled within on month and in any case before the end of the Financial Year i.e. before 31st March of every year. |

| | |
|---|---|
| 6) | The unspent balance of the advance shall be remitted into University account immediately after the purpose of the advance is over. In case of delay in remittance for more than seven days, penal interest at the rate specified by Management Council shall be charged on the unspent amount. |

वरील तरतूदीमध्ये देण्यात आलेली आग्रीम रक्कम ज्या कामासाठी दिलेली आहे. त्याच कामासाठी वापरली पाहिजे. तसेच आग्रीम रक्कमेचे समायोजन करण्याची जबाबदारी आग्रीम देण्याकरिता शिफारस करणाऱ्या विभाग प्रमुखांची असून त्यांनी ज्या कामाकरिता आग्रीम देण्यात आहे ते काम संपल्यानंतर किंवा दि.३१ मार्च पुर्वी तात्काळ समायोजन करण्याबाबत कार्यवाही करावी. काम संपल्यानंतर आग्रीम मधील खर्च वजाजाता शिल्लक रक्कम सात दिवसांच्या आत जमा करणे बंधनकारक आहे. ती जमा न केल्यास त्यावर दंडव्याजाची आकरणी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने करता येते. Bombay Financial Rule मधील तरतूद क्र.१२४ (b) नुसार वार्षिक १०% ते १२.५०% पर्यंत आकारणी करता येते. मात्र या विभागाच्या असे निदर्शनास आले आहे की, काम संपल्यानंतर ही कित्येक दिवस खर्चाचे समायोजन वा शिल्लक रक्कम जमा करीत नाही ही बाब वरील नियमांशी विसंगत असून गंभीर आहे.

सबब, आग्रीम रक्कमेचे वेळेत समायोजन होण्याकरिता वरील तरतूदींचा अवलंब करण्यास व वेळेत शिल्लक रक्कम जमा न करणाऱ्यांकडून तरतूद क्र.६ प्रमाणे दंडव्याज आकारण्यास तसेच सदर व्याजाचा दर Bombay Financil Rule मधील तरतूदीनुसार ठरविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव:** **प्रस्तूत विद्यापीठातील शिक्षक / शिक्षकेतर सेवकांना, संलग्नित महाविद्यालयास व महाविद्यालयातील शिक्षकांना देण्यात येणाऱ्या आग्रीम रकमेतून खर्च वजा जाता उर्वरित रक्कम ३० दिवसाच्या आत विद्यापीठात जमा करण्याबाबत व ही रक्कम ३० दिवसाच्या आत विद्यापीठात जमा न केल्यास नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल असे कळविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ] सोलापूर विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह मेस क्र. १ व मेस क्र. २ चालविणे या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: वरील विषयांस अनुसरून विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह मेस क्र. १ व मेस क्र. २ चालविणे या कामाचे जाहिर निविदा प्रसिध्दीकरण वृत्तपत्रात खालील प्रमाणे करण्यात आलेले होते.

| अ. क्र. | वृत्तपत्राचे नांव | जाहिर प्रसिध्दीकरण दिनांक | अंतिम तारिख | मुदतीत प्राप्त एकूण निविदा संख्या |
|---|---|---|---|---|
| ०१. | दै.पुण्यनगरी | दि.२०/०६/२०१४ | दि.३०/०६/२०१४ (पहिली मुदतवाढ) | मेस क्र.०२ (०२) मेस क्र.०१ (०२) |
| ०२. | दै. पुण्यनगरी | दि.०१/०७/२०१४ | दि.०९/०७/२०१४ (दुसरी मुदतवाढ) | मेस क्र.०२ (०३) मेस क्र.०१ (०३) |

वरील अ.क्र. ०३ नुसार जाहिर प्रसिध्दी करणानुसार मुलांचे वसतीगृह **मेस क्र. १ व मेस क्र. ०२** चालविणे या कामाचे प्रत्येकी एकूण तीन निविदा प्राप्त झालेल्या दि.१५/०७/२०१४ रोजी निविदाधारक व निविदा उघडणे समिती सदस्य यांचेसमोर तांत्रिक निविदा उघडण्यात आली. मेस.क्र. ०१ व मेस क्र.०२ या कामाच्या प्राप्त तीनही तांत्रिक निविदा उघडण्यात आलेले असता निविदेमधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रांची पडताळणी केली असता आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता तीनही निविदाधारक करीत नसल्याबाबत निविदा उघडणे समितीने दर्शविलेले आहे. त्यामुळे वरिल परिस्थीतीचा विचार करिता सात दिवसाची तिसरी मुदतवाढी ची निविदा सूचना दि.२४/०७/२०१४ रोजीच्या दै. पुण्यनगरी या दैनिकामध्ये देण्यात येवून अंतिम दि.०५.०८.२०१४ पर्यंत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास मेस क्र. १ ची एका फर्मकडून व मेस क्र. २ ची एका फर्मकडून निविदा प्राप्त झाल्या सदर तांत्रिक निविदा निविदाधारक व निविदा उघडणे समिती यांच्या समोर उघडण्यात आल्या. तांत्रिक निविदा प्राप्त झालेल्या निविदाधारकाची दराची निविदा याच समिती समोर उघडण्यात येऊन प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मेस क्र. १ साठी मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांची व मेस क्र.२ साठी मे.जुगल महाराज केटरर्स, सोलापूर यांची तुलनात्मक तक्त्यामधील दराने सोलापूर विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृहातील मेस चालविणे साठी शिफारस करण्यात आली आहे.

सबब विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृहातील मेस क्र. १ व मेस क्र. २ चालविणेचे काम सोबत जोडलेल्या तुलनात्मक तक्त्यामधील दराप्रमाणे अनुक्रमे मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांना मेस क्र. १ व मे.जुगल महाराज केटरर्स, सोलापूर यांना मेस क्र. २ अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देणेबाबत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

**ठराव: सोलापूर विद्यापीठ परिसरातील मुलांचे वसतिगृह मेस क्र. १ व मेस क्र. २ चालविण्याकरिता प्राप्त निविदेतील तुलनात्मक तक्त्यामधील दराप्रमाणे अनुक्रमे हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांना मुलांचे वसतिगृह मेस क्र.१ व मे. जुगल महाराज केटरर्स, सोलापूर यांना मुलांचे वसतिगृह मेस क्र. २ अकरा महिन्याच्या कालावधीसाठी चालविण्यास देण्याबाबत सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**कामाचे नांव- मुलांचे वसतीगृह येथील मेस क्र.१ चालविणे** **दि. ०७/०८/२०१४**

**कामाचा कालावधी - ११ महिने** **दराचा तुलनात्मक तक्ता**

**बयाणा रक्कम - रु.५,०००/-**

| **अ.क्र** | **तपशिल** | **मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर** |
|---|---|---|
| | | **निविदे मध्ये नमुद केलेले दर** |
| १ | **दोन्ही वेळचे जेवण (प्रति महिना) (अमर्यादित)**<br>१.चपाती/भाकरी<br>२.सुकी भाजी<br>३.पातळ भाजी<br>४ वरण/आमटी<br>५.भात<br>६.शेंगा चटणी/लोणचे/पापड/कोशींबीर<br>७.दहीवाटी/ताक<br>८.कांदा,लिंबू<br>आठवडयातून एक दिवस मिष्ठान्न भोजन | रु.१४५०/- |
| २ | **एका वेळेचे वरील मेनूप्रमाणे जेवण** [प्रति महिना] **(अमर्यादित)** | रु.--- |
| ३ | **अल्होपाहार पदार्थ** | |
| | १.शिरा/उपीट [१ प्लेट]१०० ग्रॅम | रु.५/- |
| | २. पोहे [१ प्लेट] १०० ग्रॅम | रु.५/- |
| | ३.वडा सांबर [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१०/- |
| | ४.इडली सांबर [२ नग] ३० ग्रॅम प्रति नग | रु.१०/- |
| | ५.टोमॅटो ऑम्लेट [१ प्लेट] | रु.१२/- |
| | ६. चहा [साधा] ६५ मिली | रु.५/- |

| | | |
|---|---|---|
| | ७.चहा[स्पेशल] ६५ मिली | रु.६/- |
| | ८.नेस कॉफी -६५ मिली | रु.७/- |
| | ९.दूध - १०० मिली | रु.७/- |
| | १०.समोसा/कचोरी/वडापाव[१ नग] [८० ग्रॅम प्रति नग] | रु.६/- |
| | ११.मॅगी | रु.१२/- |
| | १२.शाबुदाना खिचडी १२५ ग्रॅम | रु.१२/- |
| | १३.शाबुवडा [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१२/- |
| | १४.मिसळ पाव | रु.१२/- |
| | १५.कोल्ड्रींक्स | M.R.P.प्रमाणे |
| | १६.पाणी बॉटल | M.R.P.प्रमाणे |
| | १७.मिल्क शेक | M.R.P.प्रमाणे |
| | १८.आईसक्रीम | रु.१२/- |
| | १९.कोकम | रु.१०/- |
| | **शेरा** | **शिफारस आहे.** |

विद्यापीठ परिसरातील **मुलांचे वसतिगृह येथील मेस क्र.१** चालविणेचे काम सर्वात कमी दराचे पुरवठाधारक **मे.हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर** यांना देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|---|---|
| **सदस्य** | **सदस्य** | **सदस्य** | **वित्त व लेखाधिकारी** | **कुलसचिव** | **मा.कुलगुरु सो** |
| **खरेदी समिती** | **खरेदी समिती** | **खरेदी समिती** | | | |

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**कामाचे नांव- मुलांचे वसतीगृह येथील मेस क्र.२ चालविणे**

**दि.०७/०८/२०१४**

**कामाचा कालावधी - ११ महिने** **दराचा तुलनात्मक तक्ता**

**बयाणा रक्कम - रु.५,०००/-**

| अ.क्र | तपशिल | मे.जुगल महाराज केटरर्स, सोलापूर<br>निविदे मध्ये नमुद केलेले दर |
|---|---|---|
| १ | **दोन्ही वेळचे जेवण (प्रति महिना) (अमर्यादित)**<br>१.चपाती/भाकरी<br>२.सुकी भाजी<br>३.पातळ भाजी<br>४ वरण/आमटी<br>५.भात<br>६.शेंगा चटणी/लोणचे/पापड/कोशींबीर<br>७.दहीवाटी/ताक<br>८.कांदा,लिंबू<br>आठवडयातून एक दिवस मिष्ठान्न भोजन | रु.१३०१/- |
| २ | **एका वेळचे वरील मेनूप्रमाणे जेवण** [प्रति महिना] **(अमर्यादित)** | रु.७००/- |
| ३ | **अल्होपाहार पदार्थ** | |
| | १.शिरा/उपीट [१ प्लेट]१०० ग्रॅम | रु.१०/- |
| | २. पोहे [१ प्लेट] १०० ग्रॅम | रु.१०/- |
| | ३.वडा सांबर [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१५/- |
| | ४.इडली सांबर [२ नग] ३० ग्रॅम प्रति नग | रु.१०/- |
| | ५.टोमॅटो ऑम्लेट [१ प्लेट] | रु.१२/- |
| | ६. चहा [साधा] ६५ मिली | रु.५/- |

| | | |
|---|---|---|
| | ७.चहा[स्पेशल] ६५ मिली | रु.८/- |
| | ७.चहा[स्पेशल] ६५ मिली | रु.१०/- |
| | ८.नेस कॉफी -६५ मिली | रु.१०/- |
| | ९.दूध - १०० मिली | रु.१०/- |
| | १०.समोसा/कचोरी/वडापाव[१ नग] [८० ग्रॅम प्रति नग] | रु.१०/- |
| | ११.मॅगी | रु.१५/- |
| | १२.शाबुदाना खिचडी १२५ ग्रॅम | रु.२०/- |
| | १३.शाबुवडा [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.२०/- |
| | १४.मिसळ पाव | रु.२०/- |
| | १५.कोल्ड्रींक्स | रु.१५/ |
| | १६.पाणी बॉटल | रु.१५/ |
| | १७.मिल्क शेक | रु.१५/ |
| | १८.आईसक्रीम | रु.१०/ |
| | १९.कोकम | रु.१०/ |
| | **शेरा** | **शिफारस आहे** |

विद्यापीठ परिसरातील **मुलांचे वसतिगृह येथील मेस क्र.२** चालविणेचे काम जेवणासाठी सर्वात कमी दराचे पुरवठाधारक **मे. जुगल महाराज केटरर्स, सोलापूर** यांना देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|---|
| **सदस्य**<br>**खरेदी समिती** | **सदस्य**<br>**खरेदी समिती** | **वित्त व लेखाधिकारी** | **कुलसचिव** | **मा. कुलगुरु साो** |

**<u>मा.कुलगुरुमहोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:</u>**

**[ १४(१) ] वित्त व लेखा समितीवर सदस्याचे नामनिर्देशनाबाबत.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५(२) (v) नुसार व्यवस्थापन परिषदेने व्यवस्थापन परिषदेमध्ये असलेल्या सदस्यांमधून प्रा. एस.व्ही. लोणीकर, रसायनशास्त्र संकुल यांची वित्त व लेखा समितीवर नामनिर्देशन करण्यात आलेले होते.

प्रा. एस. व्ही. लोणीकर हे विद्यापीठाकडील रसायनशास्त्र संकुलामध्ये कार्यरत होते. ते नियत वयोमानानुसार दि.३०/०६/२०१४ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. प्रा. एस. व्ही. लोणीकर यांच्या सेवानिवृत्तीमूळे रिक्त झालेल्या या जागेवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ७५(२) (v) नुसार व्यवस्थापन परिषदेमध्ये असलेल्या सदस्यांमधून नामनिर्देशन करावयाचे आहे.

सबब, व्यवस्थापन परिषदेमध्ये असलेल्या सदस्यांमधून वित्त व लेखा समितीवर सदस्य म्हणून नामनिर्देशन होण्याची बाब विचारार्थ).

**ठराव: वित्त व लेखा समितीवर महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम ७५ (२) (v) नुसार व्यवस्थापन परिषदेने डॉ. श्रीमती एस. आर. याजमान्य यांचे सर्वानुमते नामनिर्देशन केले.**

**[ १४(२) ] श्री. राजेश अग्रवाल समितीची शिफारस लागू करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य शासनाने राज्यातील सर्व विद्यापीठांकडून घेण्यात येत असलेल्या परीक्षांच्या पेपर फुटीवर सर्वकष आल्यास विविध उपाययोजना करण्यासाठी मा. राजेश अग्रवाल सचिव माहिती व तंत्रज्ञान मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती उच्च व तंत्र शिक्षण शासन निर्णय क्रमांक.संकीर्ण-२०१२/प्र.क्र./२००.२००/१२/विशि-३ मंत्रालय मुंबई दि.२०/०७/२०१२ अन्वये गठीत करण्यात आलेली होती. [सोबत प्रत जोडली आहे.] सदर समितीच्या शिफारशीस अनसरुन सोलापूर विद्यापीठाने २० शिफारशी प्रत्यक्षात अंमलबजावणी केलेली आहेत. [सोबत प्रत जोडली आहे.] परंतु खालील नमूद शिफारशी सद्यस्थितीत अंमलात आणावयाचे प्रस्तावित असून त्याकरीता सदरचा विषय मा. कुलगुरु महोदय यांनी व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ ठेवण्यास मान्यता दिलेली आहे.

1. Online ques. Paper Delivery. (Secure Delivery of Examination paper)
2. OMR & Barcode Technology in cover page of Answer sheet
3. Online Examination
4. Digital Scanning & Onscreen valuation

वर नमूद एकूण ४ बाबींची विद्यापीठाने अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. याकरीता Pilot बेसीसवर प्रोफेशनल या अभ्यासक्रमांना टप्याटप्यांने अमंलबजावणी करावे लागणार आहे. तसेच वरील शिफारशीची अमंलबजावणी करण्याकरीता इतर विद्यापीठाने ज्याप्रमाणे मॉडेल वाईज अमंलबजावणी केलेले आहेत त्याचप्रमाणे करावे लागणर आहे. तसेच माहे ऑक्टो/नोव्हें २०१४ मध्ये घेण्यात येणाऱ्या सत्रनिहाय परीक्षाकरीता वरील शिफारशी पैकी १ व २ शिफारशीच्या अमंलबजावणी प्रथम करावे असे वाटते.

वरील परीक्षेचे कार्यालयीन कामकाज हे अतिसंवेदनशील व गोपनिय प्रकारचे असल्याने सदर कामकाज कोणाकडून करुन घ्यावेत याबाबतचे व दर ठरविण्याचे अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना असावेत याबाबत विचारार्थ सादर).

**ठराव :**

**१) श्री. राजेश अग्रवाल समितीने सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी परीक्षा विभागामार्फत टप्याटप्याने करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.**

**२) परीक्षा विभागातील प्रश्नपत्रिकेची छपाई, प्रश्नपत्रिकेचे ऑनलाईन डिस्ट्रीब्यूशन, बारकोड उत्तरपत्रिका छपाई व बारकोड उत्तरपत्रिकेचे स्कॅनिंग इ. कामे अति संवेदनशील व गोपनिय प्रकारची असल्याने सदरचे कामकाज कोणाकडून करुन घ्यावे व या कामकाजाबाबतचे दर काय असावे हे ठरविण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना देण्याचे ठरले. त्यानुसार इतर विद्यापीठाप्रमाणे गोपनिय कामाबाबतचे Ordinance तयार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ १४(३) ] मे. आयडियल एंटरप्रायझेस, होटगी रोड, सोलापूर या खाजगी कंत्राटदारास मनुष्यबळ पुरविण्यासाठी तीन महिन्याची मुदतवाढ देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणीः विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी मुनष्यबळ पुरविण्याकरिता नोंदणीकृत ठेकेदारांकडून/पुरवठादारांकडून दि.१९/०७/२०१४ पर्यंत ई-निविदा सादर करणेबाबत दैनिक लोकमत या वर्तमान पत्रात व www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार एकूण ०७ ई-निविदा प्राप्त झाले होते. सदर प्राप्त झालेल्या ई-निविदा ठेकेदारांचे तांत्रिकबाबींची तपासणी करण्याकरिता मा.कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने विद्यापीठ कार्यालयात दि.२८/०७/२०१४, ३०/०७/२०१४ व दि.०५/०८/२०१४ रोजी बैठका घेवून त्याचा अहवाल या कार्यालयास दि.०६/०८/२०१४ रोजी सादर केला आहे. सदरचा अहवाल मा.कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार दि.०७/०८/२०१४ रोजी दरपत्रक समितीपुढे सादर केला असता, समितीने एकाच ठेकेदाराची ई-निविदा पात्र ठरविले आहे व उर्वरित अपात्र ठरविले आहे.

यास्तव नव्याने ई-निविदेद्वारे व दरम्यानच्या काळात विधानसभेची आदर्श आचारसहिंता लागू होण्याची शक्यता असल्याने सध्याच्या मनुष्यबळ पुरवठदारास तीन महिन्याच्या कालावधीकरिता (दि.०१/०९/२०१४ ते ३०/११/२०१४ पर्यंत) **मे. आयडियल एंटरप्रायझेस, होटगी रोड, सोलापूर या खाजगी कंत्राटदारास मुदतवाढ देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).**

**ठराव : मे. आयडियल एंटरप्राईजेस, सोलापूर या सध्याच्या मनुष्यबळ पुरवठादारास दि.०१/०९/२०१४ ते दि.३०/११/२०१४ या तीन महिन्याच्या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[१४(४)] विद्यापीठ परिसरातील "उपाहारगृह चालविणेचे" या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविणे या कामाची जाहीर निविदा सूचना दिनांक ०१.०५.२०१४ रोजी **दै.संचार** मध्ये प्रसिध्द करण्यात आली होती. त्यास अनुसरुन निविदा विद्यापीठ कार्यालयात पोहोच करण्याची अंतीम तारीख २३.०५.२०१४ ही होती. त्यानुसार सदर मुदतीत एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या. मात्र पदवीधर निवडणुकांची आचार संहिता चालू असल्याने निविदा उघडता आले नाही. यासाठी परवानगी मागण्यासाठी निवडणूक आयोगास दि.२७.०५.२०१४ रोजी पत्र पाठविले होते. त्यानुसार दि.२३.०६.२०१४ रोजी निविदा धारक व खरेदीसमिती सदस्यांसमोर सदर कामाचे तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता प्राप्त निविदापैकी एकच निविदा तांत्रिक निविदेमध्ये पात्र झाल्याने सदर कामाची पहिली मुदतवाढीची सूचना दै.संचार मध्ये २४.०६.२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विद्यापीठ कार्यालयात पोहोच करण्याची अंतीम तारीख ०३.०७.२०१४ रोजी होती.

त्या अनुषंगाने सदर मुदतीत एकही निविदा प्राप्त झाली नाही. सदर कामाची दुसरी मुदतवाढीची सूचना दै.संचार मध्ये ०६.०७.२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. निविदा विद्यापीठ कार्यालयात पोहोच करण्याची अंतीम तारीख दि.१७.०७.२०१४ रोजी होती. सदरचे मुदतीत एक निविदा प्राप्त झालेली होती. सदरची निविदा दि.१९.०७.२०१४ रोजी प्राप्त झालेल्या निविदा निविदा धारक व खरेदीसमिती सदस्यांसमोर सदर कामाचे तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता प्राप्त एक निविदां तांत्रिक निविदेमध्ये अपात्र ठरविण्यात आली. एकच निविदा पात्र झाली असल्याने तिसरी व अंतिम मुदतवाढ दि.३१.०७.२०१४ रोजी प्रसिध्दी करुन अंतिम दि.८.८.२०१४ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या असता त्यामध्ये एक निविदा प्राप्त झाली. प्राप्त निविदा दि.१२.०८.२०१४ रोजी खरेदी समिती व वित्त व लेखा अधिकारी यांचे समोर उघडण्याम आल्या. त्यात पहिली पात्र झालेली निविदा व आताची पात्र निविदा अशा एकूण दोन पात्र निविदा ंची आर्थिक निविदा निविदाधारक व खरेदी समिती यांच्यासमोर उघडण्यात आल्या. सदरील निविदांचा तुलनात्मक तक्ता सोबत जोडला आहे. सदरील निविदांमध्ये सर्वात कमी दर मे. हॅाटेल शिवनेरी अँड मेस, सोलापूर यांची शिफारस करण्यात आलेली आहे.

सबब समितीच्या शिफारशीनुसार व सोबत जोडलेल्या तक्त्यातील दरानुसार सदरचे उपाहारगृह **मे. हॅाटेल शिवनेरी अँड मेस, सोलापूर** यांना चालविण्यास देणेची बाब विचारार्थ).

ठराव : **विद्यापीठ परिसरातील "उपाहारगृह चालविणे" या कामाच्या प्राप्त निविदेतील तुलनात्मक तक्त्यानुसार मे. हॅाटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांना अकरा महिन्याच्या कालावधीसाठी उपाहारगृह चालविण्यास देण्यासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**कामाचे नांव- सोलापूर विद्यापीठाच्या आवारातील उपाहारगृह चालविणे** **दि. १२/०८/२०१४**

**कामाचा कालावधी - ११ महिना** **उपाहारगृह दराचा तुलनात्मक तक्ता**

**बयाणा रक्कम - रु.२,५००/-** **पात्र निविदा फॉर्म : ०२**

| अ.क्र | तपशिल | मे. सोनिया मागासवर्गीय बहुउद्देशिय महिला शिक्षण संस्था, सोलापूर | | मे.हॉटेल शिवनेरी अँड मेस , सोलापूर. | |
|---|---|---|---|---|---|
| | | निविदे मध्ये नमुद केलेले दर | | निविदे मध्ये नमुद केलेले दर | |
| १ | **एका वेळेचे जेवण**<br>१.चपाती/भाकरी<br>२.सुकी भाजी<br>३.पातळ भाजी<br>४ वरण/आमटी[अमर्यादित]<br>५.भात<br>६.शेंगा चटणी/लोणचे/पापड/कोशींबीर<br>७.दहीवाटी/ताक<br>८.कांदा,लिंबू | -- | - | रु. ३०/- | (३०/-) |
| २ | कार्यालयीन बैठकासाठी एका वेळेचे मिष्टान्न भोजन [अमर्यादित] | -- | - | रु.४५/- | (४५/-) |
| ३ | **अल्होपाहार पदार्थ** | | | | |
| | १.शिरा/उपीट [१ प्लेट]१०० ग्रॅम | रु.५/- | - | रु.५/- | Same rate |
| | २. पोहे [१ प्लेट] १०० ग्रॅम | रु.५/- | - | रु.५/- | Same rate |
| | ३.वडा सांबर [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१०/- | - | रु.१०/- | Same rate |
| | ४.इडली सांबर [२ नग] ४० ग्रॅम प्रति नग | रु.१५/- | - | रु.१०/- | L-1 |
| | ५.टोमॅटो ऑम्लेट [१ प्लेट] | रु.५/- | L-1 | रु.१२/- | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ६. चहा [साधा] ६५ मिली | रु.८/- | - | रु.५/- | L-1 |
| | ७.चहा[स्पेशल] ६५ मिली | रु.७/- | - | रु.६/- | L-1 |
| | ८.नेस कॉफी -६५ मिली | रु.१०/- | - | रु.७/- | L-1 |
| | ९.दूध - १०० मिली | नियमाप्रमाणे | - | रु.७/- | Same rate |
| | १०.समोसा/कचोरी/वडापाव[१ नग] [८० ग्रॅम प्रति नग] | रु.१०/- | - | रु.६/- | L-1 |
| | ११.मॅगी | रु.१५/- | - | रु.१२/- | L-1 |
| | १२.शाबुदाना खिचडी १२५ ग्रॅम | रु.१५/- | - | रु.१२/- | L-1 |
| | १३.शाबुवडा [२ नग] ४० ग्रॅम प्रतिनग | रु.१५/- | - | रु.१५/- | Same rate |
| | १४.मिसळ पाव | रु.१५/- | - | रु.१२/- | L-1 |
| | १५.कोल्ड्रींक्स | नियमाप्रमाणे | - | MRP | Same rate |
| | १६.पाणी बॉटल | नियमाप्रमाणे | - | MRP | Same rate |
| | **शेरा** | - | -- | **शिफारस आहे.** | -- |

विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविणेचे काम सर्वात कमी दराचे पुरवठाधारक **मे.हॉटेल शिवनेरी अँड मेस , सोलापूर.** यांना देण्याची शिफारस करण्यात येत आहे.

| सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|---|---|
| **सदस्य खरेदी समिती** | **सदस्य खरेदी समिती** | **सदस्य खरेदी समिती** | **वित्त व लेखाधिकारी** | **कुलसचिव** | **मा.कुलगुरु साो** |

**[१४(५)] दि.१९/०८/२०१४ रोजीच्या बांधकाम समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव सादर.**

(टिपणी: बांधकाम समितीची सभा दि. १९/०८/२०१४ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. या सभेच्या कार्यवृत्तांतास व्यवस्थापन परिषदेची मान्यता स्टॅट्यूट क्रमांक ३३९ (f) ची तरतूद खालील प्रमाणे आहे.

[After the meeting, the minutes shall be drawn by the Member Secretary who shall get them approved from the Chairman. The recommendations of the Buildings and Works Committee shall be placed before the Management Council for its approval]

त्यानुसार दि.१९/०८/२०१४ रोजीचा बांधकाम समितीचा कार्यवृतांत विचारार्थ).

**ठराव : बांधकाम समितीच्या दि.१९/०८/२०१४ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**